SYBA/Geography/sem-3/Paper-3/unit-1

# भारताचा प्राकृतिक भूगोल [Physical Geography of India]






prof- J.J.KHANDVI
Department Of Geography
sau.S.R.K.& Late M.B.B.I.
Senior College Dahanu,
Palghar,Maharashtra

Scanned with CamScanner

प्रकरण-१

# भारताचा परिचय [Introduction of India]

१.१] भारत- स्थान आणि विस्तार

१.2] भारत- प्रमुख प्राकृतिक विभाग

१.2.१] हिमालय पर्वतीय प्रदेश

१.2.२] उत्तर भारतीय मैदानी प्रदेश

१.2.३] द्वीपकल्पीय पठारी प्रदेश

१.2.४] किनारी मैदानी प्रदेश

१.2.५] भारतीय बेटे

Scanned with CamScanner

# भारत: स्थान व विस्तार-


भारत देश हा विषुववृत्ताच्या उत्तरेस आहे त्यामुळे तो उत्तर गोलार्धात येतो.

भारत- अक्षवृत्तीय विस्तार- ८* ४' २८" उत्तर अक्षांश ते ३७* ६' ५३"उत्तर अक्षांश आणि

रेखावृत्तीय विस्तार ६८* ७' ३३" पूर्व रेखांश ते

९७*२५'४७" पूर्वरेखांशाच्या दरम्यान आहे

अलाहाबाद जवळून जाणारे ८२ अंश 30 मिनिट पूर्व रेखांश भारताचे प्रमाण रेखावृत्त मानले जाते.
अलाहाबाद ची स्थानिक वेळ भारतीय प्रमाणवेळ मानली जाते ती ग्रीनिच वेळेच्या ५ तास ३० मिनिट पुढे आहे.




Scanned with CamScanner

- भारताची पूर्व पश्चिम लांबी 2933 किलोमीटर असून उत्तर दक्षिण लांबी 3214 किलोमीटर आहे
- भारताला उत्तम प्रकारची भू सरहद्द [भूसीमा] लाभलेली असून तिची एकूण लांबी 15200 किलोमीटर आहे.
- तसेच भारताला सागरी सरहद्द [सागरीसीमा] देखील लाभले असून तिची एकूण लांबी 7516 किलोमीटर आहे.
- भारताचे एकूण क्षेत्रफळ 32 लाख 87 हजार 263 चौरस किलोमीटर असून जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी ते 2.4 टक्के आहे
- क्षेत्रफळाच्या बाबतीत भारताचा जगात सातवा क्रमांक आहे.

Scanned with CamScanner

# भारत प्रमुख प्राकृतिक विभाग [Major Physical Division of India]

## प्राकृतिक रचनेनुसार भारताचे प्रमुख प्राकृतिक विभाग केले जातात ते विभाग खालील प्रमाणे

1. हिमालय पर्वतीय प्रदेश
2. उत्तर भारतीय मैदानी प्रदेश
3. द्वीपकल्पीय पठारी प्रदेश
4. किनारपट्टीचे मैदानी प्रदेश
5. भारतीय बेटे





Scanned with CamScanner

# १.२.१] हिमालय पर्वतीय प्रदेश-

- भारताच्या प्राकृतिक रचनेचा एक प्रभावी घटक म्हणजे हिमालय पर्वत होय.
- या पर्वताचा बराच भाग नेहमी हिमाच्छादित असल्याने हा पर्वत हीमाद्री किंवा हिमाचल किंवा हिमालय या नावाने ओळखला जातो.
- जगातील सर्वात उंच व सर्वात तरुण असलेल्या या घडी पर्वताची उंची 8000 मीटर पेक्षा अधिक आहे .
- या पर्वत रांगा भारताच्या संपूर्ण उत्तर सीमेवरून पूर्व पश्चिम दिशेने सुमारे 2500 किलोमीटर पसरलेले आहेत. त्यांची रुंदी 150 ते 400 किलोमीटर व क्षेत्रफळ सुमारे पाच लाख चौरस किलोमीटर इतके आहे
- हिमालय ही एकत्र पर्वत रांग नसून अनेक पर्वत रांगा परस्परांना समांतर पसरलेल्या आहेत या पर्वत रांगा अनेक ठिकाणी नद्यांच्या खोऱ्यांनी छेदल्या आहेत.
- हिमालयात अनेक लहान-मोठी पठारी आहे त्यामध्ये चेरापूंजी पठार शिलॉंग पठार लढाख पठार महत्वाचे आहेत.

Scanned with CamScanner

# हिमालय पर्वत




Scanned with CamScanner

## प्राकृतिकदृष्ट्या हिमालय पर्वत श्रेणीचे तीन प्रमुख उपविभाग पडतात.

**१] महाहिमालय किंवा हिमाद्री**
**२] हिमाचल किंवा मध्य हिमालय**
**३] शिवालिक टेकड्या किंवा बाह्य हिमालय**

## १] महाहिमालय किंवा हिमाद्री-

- अति उत्तरेकडील हिमालयाच्या पर्वतरांगाना हिमाद्री असेही म्हणतात. हिमाद्रीची रुंदी 120 ते 190 किलोमीटर आहे, रुंदीत बरीच विषमता आढळते. या पर्वतश्रेणीत अनेक महत्त्वाच्या खिंडी आहेत त्यामध्ये बारा लापचा ला, नथु ला, जीप ला, शेतकीला शिपकी ला, जोजी ला, इत्यादी आहेत.
- हिमाद्री हा हिमालयाचा सर्वात जास्त उंचीचा असणारा भाग आहे. या क्षेत्रातील पर्वताची सरासरी उंची 6000 मीटर असून, त्यात के-2 [8611] नंगा पर्वत[ 8126 ]धवलगिरी [8167] कांचनगंगा [8598] मिटर यासारखे महत्वाची शिखरे आहेत
- के-2 हे भारतातील सर्वात उंच शिखर आहे.

Scanned with CamScanner

## २] हिमाचल किंवा मध्य हिमालय-

- हिमाद्री च्या दक्षिणेस असणाऱ्या ६० ते ८० किलोमीटर रुंदीच्या पर्वत श्रेणी ला हिमाचल असे म्हणतात.
- या पर्वत श्रेणी ची सरासरी उंची ३५००ते ५००० मीटर आहे. या पर्वत श्रेणीचे स्वरूप मात्र तुटक तुटक आहे.
- हिमाचल क्षेत्रात उंच पर्वतीय भागाबरोबरच गंगेसारख्या महान नद्यांची खोरी असल्याने प्राकृतिक रचनेत सलगता नाही.
- येथे पिरपंजाल, नागतिब्बा, मसूरी, या पर्वत रांगा आहेत. रानीखेत,मसुरी,नैनिताल,शिमला हे थंड हवेचे ठिकाण या पर्वतमालेत आहेत.

## ३] शिवालिक टेकड्या किंवा बाह्य हिमालय-

- शिवालिक टेकड्या हिमालयाच्या दक्षिणेस असणाऱ्या पर्वतीय भागास शिवालिक टेकड्या असे म्हणतात
- हिमालयाचा हा भाग सरासरी ६०० ते १५०० मीटर उंचीचा असल्याने पर्वत टेकड्या मिश्र स्वरूपाचा आहे.
- या टेकड्या वालुका,माती,शैल,यांच्या संचयनाने निर्माण झालेल्या आहेत या टेकड्यांची रुंदी १५ ते ५० किलोमीटर आहे .
- हिमालयाच्या निर्मितीनंतर येथील काही टेकड्या उंचावलेल्या आहेत.
- शिवालिक टेकड्यांच्या उत्तर भागात नद्यांनी तयार केलेली विस्तृत खोरी असल्याने त्यांना ड्यून असे म्हणतात.

Scanned with CamScanner


# १.२.२] उत्तर भारतीय मैदानी प्रदेश-

## स्थान-

- उत्तरेकडील हिमालय पर्वत आणि दक्षिणेकडील द्वीपकल्पीय पठार यांच्यामध्ये उत्तरेकडील विशाल मैदान पसरलेले आहे.
- हे मैदान पश्चिमेकडील राजस्थानच्या ओसाड व निमओसाड मैदानापासून पूर्वेस ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यापर्यंत पसरलेले आहे.

## विस्तार-

- उत्तरेकडील मैदानी प्रदेश पूर्वेकडून पश्चिमेकडे सुमारें २४० किलोमीटर अंतरापर्यंत पसरलेला असून त्याची रुंदी पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी होत जाते.
- रुंदी हि पश्चिमेकडे ३२० किलोमीटर तर पूर्वेकडे २४० किलोमीटर च्या दरम्यान आढळते. या मैदानी प्रदेशाने सुमारे ६५२००० चौरस किलोमीटर चे क्षेत्र व्यापले आहे.




Scanned with CamScanner

- हिमालयाच्या निर्मितीनंतर या प्राकृतिक विभागाची उत्क्रांती झाली.
- गंगा, यमुना, सिंधू ,ब्रह्मपुत्रा व उपनद्यांनी हजारो वर्षे गाळाचे संचयन केल्यामुळे या मैदानाचे सखलता वाढत गेली.
- उत्तरेकडील मैदानी प्रदेशाच्या उत्तर सीमेलगत जाडे-भरडे संचयनास **'भाबर'** म्हणतात. भाबर नंतर बारीक गाळाचा प्रदेश **'तराई'** नावाने संबोधला जातो. तर जुन्या गाळाच्या मैदानी प्रदेशाला **'भांगर'** असे म्हणतात. नदीच्या काठाला लागत नवीन गाळाच्या मैदानी प्रदेशाला **'खादर'** असे म्हणतात.
- **उत्तर मैदानी प्रदेशाचे पश्चिम, पूर्व, व उत्तर असे तीन विभाग आहेत.**
- पश्चिमेकडील मैदानाला राजस्थानचे मैदान म्हणतात. हा प्रदेश निमशुष्क मरूद्यानांचा आहे.
- उत्तर मैदानी क्षेत्रात पंजाब हरियाणा मैदान गंगा-यमुना दुआब रोहिलखंड मैदान यांचा समावेश होतो. रावी, बियास,सतलज,गंगा-यमुना नद्यांच्या दरम्यान 'दुआब' प्रकार गाळाची सखल मैदाने दर्शवतो.
- पुर्वेकडील मैदानी प्रदेशात बिहार, बंगाल, आसाम मधील मैदाने व नदीखोऱ्यांचा समावेश होतो.
- उत्तर बिहारच्या विस्तृत मैदानाची निर्मिती घागरा, गंडक, व कोसी या नद्यांनी तर दक्षिण बिहार चे मैदान उपनद्यांनी साकार झाले आहे.
- गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्यांनी बंगालच्या मैदाने विकसित केले आहे. गंगेचा त्रिभुज प्रदेश या क्षेत्रात आहे.
- गंगेच्या त्रिभुज प्रदेशाची पातळी समुद्र सपाटी लागून अवघ्या सहा मीटर उंचीवर आहे

Scanned with CamScanner

# १.२.३] द्वीपकल्पीय पठारी प्रदेश

**आकार**-भारतीय द्वीपकल्पीय पठाराचा सर्वसाधारण अनियमित त्रिकोणी आकार असून, त्याचा पाया हा भारतीय महामैदानाच्या दक्षिणेकडे आहे


पठाराचे दक्षिण टोक कन्याकुमारी कडे आहे.

**लांबी,रुंदी व क्षेत्रफळ**- भारतीय द्वीपकल्प पठाराची उत्तर - दक्षिण लांबी सुमारे १६०० किलोमीटर तर पूर्व-पश्चिम रुंदी सुमारे १४०० किलोमीटर आहे.

या पठाराचे एकूण क्षेत्रफळ १६ लाख चौरस किलोमीटर देशाच्या एकूण क्षेत्रफळापैकी साधारण निम्मे क्षेत्र भारतीय द्वीपकल्प पठाराच्या आहे

**उंची व उतार-** द्वीपकल्पीय पठाराची सरासरी उंची 600 ते 900 मीटर दरम्यान असली तरी अनेक भाग एक हजार मीटरपेक्षा जास्त उंचीचे आहे द्वीपकल्प पठाराचे सर्वात जास्त उंची दक्षिण सह्याद्री मध्ये अनैयमुडी [2695] मिटर शिखर आहे.

**राजकीय विस्तार** -भारतीय द्वीपकल्प पठार राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड ,महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, व ओडिसा या राज्यांचा समावेश होतो.




Scanned with CamScanner

# द्वीपकल्पीय पठाराची सरहद्द

द्वीपकल्प पठारीची उत्तर सरहद्द ही अनियमित रेषा आहे.
याची सुरुवात कच्छ पासून होते .नंतर अरवली रांगेच्या पश्चिम बाजूने पुढे दिल्लीजवळ यानंतर यमुना आणि गंगा प्रवाहाला समांतर अशीच पुढे राजमहाल टेकड्या आणि गंगा त्रिभुज प्रदेशास साधारण समांतर आहे.
उत्तर सरहद्द अरवलीच्या वायव्यला उत्तरेस मैकल रांग आणि ईशान्यस हजारीबाग आणि राजमहल टेंकड्यानी देखील निश्चित होते. भारतीय द्वीपकल्प पठार हे तिन्ही बाजूंनी डोंगरांनी वेढलेले आहे .

**भारतीय द्वीपकल्प पठाराचे प्राकृतिक विभाग**

1. **मध्यवर्ती उंचवट्याचा प्रदेश**
2. **दक्खन पठार**
3. **पश्चिम घाट**




Scanned with CamScanner

## १] मध्ये उंचवट्याचा प्रदेश

- मध्य भारतातील सभोवतालच्या क्षेत्रापेक्षा उंचावलेल्या भागाला मध्ये उंचवट्याचा प्रदेश असे म्हणतात .या क्षेत्रात गंगा सतलज या मैदानाच्या दक्षिण सीमेपासून सातपुड्यापर्यंत चे पठारी क्षेत्र समाविष्ट आहे.

  **या प्रदेशाचे काही उपविभाग पडतात ते खालीलप्रमाणे,**
- माळवा पठार
- अरवली पर्वत क्षेत्र
- बुंदेलखंड पठार
- छोटा नागपूर पठार

## २] दख्खनचे पठार

- नर्मदेच्या दक्षिणेकडील क्षेत्राला दख्खनचे पठार या नावाने संबोधले जाते. उत्तरेकडे सातपुडा, मैकल, हजारीबाग पर्वतरांगा, पश्चिमेकडे पश्चिम घाट ,व पूर्वेकडे पूर्व घाट,अशी या पठाराची व्याप्ती आहे.
- भारतातील सर्वात मोठे पठार म्हणून 'दख्खनचे पठार' ओळखले जाते.

  **या पठाराचे पुढील उपविभाग पडतात ते खालीलप्रमाणे,**
- माळवा पठार
- सातपुडा पर्वत
- महाराष्ट्र पठार
- तेलंगणा पठार
- मैसूरचे पठार

Scanned with CamScanner

## ३] पश्चिम घाट

- दख्खन पठाराच्या पश्चिमेकडे तापी नदीपासून केरळपर्यंतच्या दक्षिणोत्तर दिशेत पसरलेल्या उंच पर्वतीय भागात पश्चिम घाट म्हणतात.
- या पर्वतीय क्षेत्राची लांबी १६०० किलोमीटर आणि समुद्रसपाटीपासून सरासरी उंची १२०० मीटर एवढी आहे. त्यामुळे अरबी समुद्राला मिळणाऱ्या नद्या व बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या नद्या यांच्या दृष्टीने जलविभाजक तयार झाला आहे.
- पश्चिम घाटाच्या उत्तर व दक्षिण सह्याद्री असे दोन विभाग पडतात .उत्तर सह्याद्रीत कळसुबाई[ १६४६मी.] हे सर्वाच्च शिखर आहे याशिवाय महाबळेश्वर हरिश्चंद्रगड ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. सह्याद्रीच्या उत्तर भागातच गोदावरी कृष्णा कावेरी तुंगभद्रा या नद्यांचा उगम होतो.
- दक्षिण सह्याद्रीतील सर्वात उंच शिखर अनाईमुडी आहे.

## ४] पूर्व घाट

- गंगेच्या त्रिभूज प्रदेशाच्या दक्षिण टोकापासून कन्याकुमारीपर्यंत पुर्व घाटाचा विस्तार आहे. पूर्वेकडील घाट बराचसा तुटक व तुलनेने कमी उंचीचा डोंगराळ प्रदेश आहे.
- येथील सरासरी उंची 450 मीटर च्या दरम्यान आहेत उत्तर-दक्षिण दिशेस बंगालच्या उपसागराला समांतर ११०० किलोमीटर पर्यंत पसरलेला आहे.
- पूर्व घाटची रुंदी 120 किलोमीटर आहे.

Scanned with CamScanner

# १.२.४] भारतीय किनारपट्टी मैदान

भारतीय द्वीपकल्पाच्या पश्चिम व पूर्व भागात लांब व अरुंद प्रदेश आहे यालाच किनारपट्टी मैदान असे म्हणतात.

भारतीय सागर किनारपट्टीची लांबी ५६८० कि.मी. आहे. भारतास पूर्व किनारपट्टी व पश्चिम किनारपट्टी अशा दोन किनारपट्या आहेत

**भारतीय किनारपट्टीच्या मैदानाची प्राकृतिक विभागणी पुढीलप्रमाणे**

**१] पश्चिम किनारपट्टी मैदान**

**२] पूर्व किनारपट्टी मैदान.**




Scanned with CamScanner

## १]पश्चिम किनारपट्टी

- अरबी समुद्र आणि सह्याद्री पर्वतरांग [पश्चिम घाट] यांच्या दरम्यान पश्चिम किनारपट्टी मैदान आहे.
- किनारपट्टीच्या मैदानाची लांबी 1400 किलोमीटर व रुंदी 10 ते 80 किलोमीटर असून क्षेत्रफळ 243600 चौरस किलोमीटर आहे.
- किनारपट्टीच्या मैदानी प्रदेशात गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, आणि केरळ या राज्यांचा किनारपट्टीचा भाग व तामिळनाडू राज्याचा कन्याकुमारी जिल्ह्याचा समावेश होतो .
- वेगवेगळ्या राज्यांमध्ये या किनारपट्टी यांना वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते महाराष्ट्रात 'कोकण' कर्नाटक मध्ये 'कारवार' केरळमध्ये 'मलबार' असे म्हणतात

## पश्चिमकिनारपट्टीचे मैदाने -

१] कच्छ द्वीपकल्प
२] कच्छचे रण
३] काठेवाढ द्वीपकल्प
४] गुजरात मैदान
५] कोकण किनारपट्टी
६] कर्नाटक किनारपट्टी
७] केरळ किनारपट्टी

Scanned with CamScanner

## २] पूर्व किनारपट्टी

- पूर्व किनारपट्टीचा प्रदेश बंगालच्या उपसागराला लागून आहे याला कोरोमंडल म्हणतात.
- पूर्व किनारपट्टी पश्चिम बंगाल पासून थेट कन्याकुमारीपर्यंत आहे. पूर्व किनारपट्टी पश्चिम किनारपट्टी पेक्षा जास्त रुंद आहे.
- या किनारपट्टीतून महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी, इत्यादी नद्या वाहत गेल्या आहेत. या नद्यांनी आपल्या मुखाशी त्रिभुज प्रदेश तयार केले आहेत.
- या किनारपट्टीवर खाऱ्या पाण्याची सरोवरे आढळतात. उदा.'चिल्का' आणि 'पुलिकत' हे सरोवर प्रसिद्ध आहेत.

## पूर्व किनारपट्टीचे मैदान

1. ओडिशा किनारपट्टी
2. आंध्र मैदान
3. तामिळनाडू मैदान

Scanned with CamScanner

# १.२.५] भारतीय बेटे-

भारतीय किनारपट्टीलगतच्या मोठ्या बेटांशिवाय किनारपट्टीपासून दूर अंतरावर हिंदी महासागरात बेटांचे मुख्य दोन गट आहेत. यापैकी एक बंगालच्या उपसागरात अंदमान आणि निकोबार द्वीपसमुह आणि दुसरा अरबी समुद्रात लक्षद्वीप बेटे यांचा आहे.

भारतीय सागरी बेटात एकूण ५९९बेटे आहेत. आहेत त्यापैकी अंदमान आणि निकोबार समूहात ५७२ बेटे आहेत तर लक्षद्वीप बेट समूहात २७ बेटे आहेत.

## बंगालच्या उपसागरातील बेटे-

अंदमान आणि निकोबार बेट समूहाचे उत्तर-दक्षिण लांबी सुमारे ५९० किलोमीटर तर पश्चिम-पूर्व रुंदी सुमारे ५८ किलोमीटर आहे. क्षेत्रफळ ८२४९ चौरस किलोमीटर इतके आहे. एकूण बेटांची संख्या 572 आहे.

**१] अंदमान बेट समूह**- अंदमान बेट समूहांची लांबी 260 किलोमीटर व रुंदी ३० किलोमीटर आहे त्याचे क्षेत्रफळ सुमारे ६५९६ चौरस किलोमीटर आहे.

**अंदमान बेट समूहाचे पुढील गटांमध्ये विभागणी केली जाते** -

1. उत्तर अंदमान,
2. मध्य अंदमान,
3. दक्षिण अंदमान,
4. बाराटांग,
5. रटलँड.

Scanned with CamScanner

## २] निकोबार बेट समूह

अंदमानच्या दक्षिणेकडे छोट्या अंदमान बेटापासून 121 किलोमीटर अंतरावर निकोबार बेटे आहेत. या बेटसमूहात ७ मोठे, १२ लहान, तर असंख्य छोटी छोटी बेटे आहेत. या बेट समूहांची उत्तर दक्षिण लांबी 265 किलोमीटर तर पश्चिम-पूर्व रुंदी 58 किलोमीटर असून त्यांचे क्षेत्रफळ सुमारे १६५३ चौरस. किलोमीटर आहे. निकोबार बेट प्रामुख्याने प्रवाळ खडकापासून निर्माण झालेला आहे.

## अरबी समुद्रातील बेटे-

### लक्षद्वीप बेटे-

लक्षद्वीप बेट समूहात एकूण २७ बेटे आहेत. लक्षद्वीप बेटे विस्तृत स्वरूपात १०८.७८ चौरस किलोमीटर क्षेत्रात विखुरलेली आहेत. बेटांचे प्रत्यक्ष क्षेत्रफळ मात्र फक्त ३२ चौरस किलोमीटर आहे.

केरळ किनाऱ्यापासून 200 ते ५०० किलोमीटर नैऋत्यास लक्षद्वीप बेटे आहेत.

कालिकत पासून लक्षद्वीप बेटांचे अंतर सर्वात कमी म्हणजे फक्त 109 किलोमीटर आहे.

1973 चाली लखदीव, मिनिकॉय आणि अमिनदीबी समूहाचे नाव 'लक्षदीप' असे ठेवण्यात आले. या प्रवाळ बेटात १२ प्रवाळभित्ती ३ प्रवाली आणि ५ निमज्जन वाळू किनारे आहेत. तर २७ बेटांपैकी ११ बेटांवर वसाहती आहेत.

Scanned with CamScanner

# THANK YOU

Scanned with CamScanner